पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. फ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक १
सभावृत्तांत

दिनांक –०६/०४/२०१६ वेळ : दु ०४.००

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेष सभा बुधवार दिनांक ०६/०४/२०१६ रोजी दु ०४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात मा. श्रीमती. प्रेरणा देशभ्रतार, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनावणे
२. सौ. स्वाती प्रमोद साने
३. मा. साने दत्तात्रय बाबुराव (काका)
४. मा.जाधव साधना रामदास
५. मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
६. सौ. मंगलाताई अशोक कदम
७. मा. उबाळे सुलभा रामभाऊ
८. मा. तानाजी विठठल खाडे
९. मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१०. मा. मासुळकर समीर मोरेश्वर

याशिवाय मा. श्री. दिलीप गावडे, क्षेत्रीय अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, मा. श्री. विजय वाघमारे, प्रशासन अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय हे उपस्थित होते.

-------

| | |
|---|---|
| अतिरिक्त महानगरपालिका :आयुक्त, पुणे महानगरपालिका (पिठासीन अधिकारी) | सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेची पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. फ प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे. |

सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करते.

मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव ( सभाशाखा)

मा. फ प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण २ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सूचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | मा. सौ.मंगलाताई अशोक कदम | मा. तानाजी विठ्ठल खाडे |
| २. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | मा. बो-हाडे शुभांगी संजय | मा. जाधव साधना रामदास |

(मा प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा, यांनी त्यांना प्राप्त झालेले एकूण दोन नामनिर्देशनपत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली)

मा.पिठासीन अधिकारी :

मा. फ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एक उमेदवाराच्या एकूण २ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असून दोन नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत.
त्यामध्ये मा. फ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवून त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(मा. पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी ०४.०५ ते ०४.२० हा १५ मिनिटांचा कालावधी संपला.)

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,पुणे.
पिठासीन अधिकारी

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेण्यात आलेली नसल्याने मा. फ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणाऱ्या मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यामुळे मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फ प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

6.4.1(

(प्रेरणा देशभ्रतार)
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,पुणे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
मा.फ प्रभाग समिती

ठराव क्रमांक – १
दिनांक –०६/०४/२०१६

विषय क्रमांक – १
विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन या उमेदवाराने एकूण दोन नामनिर्देशनपत्रें मुदतीत दाखल केलेली असून दोनही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. फ प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेसाठी सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन ह्या एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे फ प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

6-4-16

(प्रेरणा देशभ्रतार)
पिठासीन अधिकारी तथा
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,पुणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी ४४
क्रमांक : फक्षेका/सभा/कावि/४६/२०१६
दिनांक : ०६/०४/२०१६

प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभा शाखा
फ प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.